

नाशिक : समर्थ रामदास स्वामींच्या हस्तलिखिताच्या डिजिटायझेशनची सीडी एन. के. ब्रह्मे यांच्याकडे देताना शरद कुबेर, प्रकाश पवार, सुधीर शिरवाडकर, ज्योतिराव खैरनार.

# समर्थ रामदास स्वामींच्या हस्तलिखिताचे डिजिटायझेशन पूर्ण

**नाशिक, ता. २५ :** समर्थ रामदास स्वामींनी १६२० ते ३३ या कालावधीत नाशिकच्या टाकळी येथील वास्तव्यात लिहिलेल्या जवळपास ३५०० ओव्या, अभंग व विविध पदे यांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. हस्तलिखिताचा संच श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी मठाचे अध्यक्ष अध्यक्ष जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्याकडे शरद कुबेर यांनी सुपूर्द केला.

धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिर येथे नानासाहेब देव यांनी या हस्तलिखिताचे जतन करून ठेवले होते. धुळे येथील मंदिराचे आताचे अध्यक्ष शरद कुबेर व श्री. डोंगरे यांनी या हस्तलिखिताचे डिजिटायझेशन करून १७ सीडींचा संच तयार केला. या वेळी प्रकाश पवार, सुधीर शिरवाडकर, ज्योतिराव खैरनार उपस्थित होते. श्री. ब्रह्मे म्हणाले, की समर्थ भक्तांना हे सर्व साहित्य टाकळी मठात मोफत उपलब्ध होईल. त्यासाठी आवश्यक संगणक, लॅपटॉप, स्वतंत्र अभ्यासाची बैठक व्यवस्था करण्यात येईल.